2019-2020

Peer Reviewed Multi-Disciplinary
Annual National Indexed Research Journal
Published as per UGC (India) Guidelines

Impact Factor
5.455
www.sjifactor.com

ISSN 2349-9370
Vol. 7 Issue 2
Jan. 2020
Special Issue

Research Journal of India

www.researchjournal.net.in www.indiramahavidyalaya.com www.mmcdarwha.org

Special Issue

One Day Interdisciplinary National Conference on

Recent Trends and Issues in Humanities

Organized by Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha

11 January 2020

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)
In Collaboration with
Principal
MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA
DARWHA, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445 202 (India)

27	१९४२ च्या 'चले जाव' चळवळीत अमरावती जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान	डॉ. गोविंद मा. तिरमनवार	97-100
28	मराठी साहित्याचे सामाजिक योगदान	डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे	101-103
29	१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात अकोला जिल्ह्यातील महिलांचे योगदान	डॉ. बाना बानखडे	104-105
30	सविनय कायदेभंग चळवळीतील महिलांचे योगदान	डॉ. घनश्याम मुकुंदराव महाडीक	106-107
31	भारतीय इतिहासात स्त्रियांचे योगदान	प्रा. डॉ. टि. डी. राजपुरे	108-109
32	भारतीय इतिहास के दर्पण में एनी बेसेंट	डॉ. शुचिस्मिता मिश्रा	110-112
33	भारतीय महिलांच्या आहाराचा अभ्यास	प्रा.डॉ. कल्पना कोरडे	113-115
34	भारतीय स्त्रियांचा आहार – एक अवलोकन	डॉ. प्रा. लता बाविला	116-120
35	भारतीय महिलांच्या आहाराचा अभ्यास	प्रा. कु. सरोज या. लखादिवे	121-123
36	भारतीय महिलांची स्वतःच्या आहाराबद्दलची अनास्था	प्रा. कु. प्रणिता रमेशराव शुल	124-126
37	बंजारा समाजातील शेतमजूर स्त्रियांचा आहार अहार आरोग्य	प्रा. सुनिता अर्जुनराव राठोड	127-133
38	कर्मठती व सानंद माताच्या सर्वांगीण विकासात हायटेक अंगणवाडीचे योगदान	प्रा.डॉ. रंजना शिवने	134-137
39	भारतीय स्त्रीच्या विविध अवस्थेतील आहाराची बदलती गरज – एक अभ्यास	प्रा. कु. वैशाली उत्तमराव कांबळे	138-140
40	भारतीय इतिहासात स्त्रियांचे योगदान	प्रा. स्मिता द. वंजारकर	141-143
41	घाटंजी तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या आहाराचा अभ्यास	प्रा. कविता किर्दक	144-145
42	शहरी महिलांचे आरोग्य विषयक समस्या	प्रा. डॉ. कु. उषा नानाजी राघुडे	146-148

(या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा संशोधनाचे अपेक्षा सुचित असून इतर प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. मात्र या लेखामधून व्यक्त शोधनिबंधातून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. पूढ संदर्भ घेताना विनंती वाचकांना व अभ्यासकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह लेखनाची गुणवत्ता टिकविणेची प्रयत्न केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी करीता येथील न्यायालयाधीनच सोडविण्यात येतील.)

ROLE OF SAROJINI NAIDU IN INDIAN FREEDOM STRUGGLE

Dr. Pradip P. Yeole
Head Dept.of History
Shri. Kisanlal Nathmal Goenka College
Karanja Lad Dist. Washim

Sarojini Naidu was born on February 13th, 1879 in Hyderabad, to Aghore Nath Chattopadhyay and Barada Sundari Devi. She belonged to a Bengali family of Kulin Brahmins. But her father, Agorenath Chattopadhyay, after receiving a doctor of science degree from Edinburgh University, settled in Hyderabad State, where he founded and administered the Hyderabad College, which later became the Nizam's College.

She attained national fame for entering Madras University at the age of twelve. As a child, Sarojini was a very bright student. She was proficient in 5 languages; Hindi, English, Persian, Urdu,Telugu and Bengali. She began writing fiction at the age of twelve. At sixteen, she travelled to England to study first at King's College London and subsequently at Girton College, Cambridge. While in England, she identified with the Suffragette movement. Also in England, she was encouraged by the poets Arthur Simon and Edmond Gausse to explore Indian themes in her writing, such as India's landscape, her temples and her people. On her return to India in 1898, she married Govindarajulu Naidu, a medical doctor who belonged to a low caste. The marriage caused some consternation in orthodox Hindu society, but it was a happy marriage.

Role In Indian Freedom Movement

It was in 1905 that she joined the Indian National Congress in protest over the Partition of Bengal.She met Gopal Krishna Gokhale through whom she came into contact with several prominent faces of India's freedom struggle including Mahatma Gandhi, Jawaharlal Nehru, Rabindranath Tagore and Annie Besant. She was urged by Gokhale to use her intellect for the cause and she dedicated herself to politics and Indian freedom movement, taking a respite from writing. Sarojini In 1906 she addressed the Indian National Congress (INC) session in Calcutta on women's education, and also spoke to the Indian Social Conference there. Awarded the colonial Kaiser-I-Hind in 1911 for flood relief work, Naidu remained a political activist

Naidu played an important role in women's rights struggle in India. She helped in shaping *Women's Indian Association* in 1917 with Annie Besant and others. The Association sought equal rights including the right to vote and represent. She presented the need to include more women in the Congress and in the freedom struggle. During 1918, British and Indian feminists including Naidu set up a magazine called *"Stri Dharma"* to present international news from a feminist perspective.

In March 1919, the British government passed the Rowlatt Act by which the possession of seditious documents was deemed illegal. Mohandas Gandhi organized the Non-Cooperation Movement to protest and Naidu was the first to join the movement which the government worked to suppress. In July 1919, Naidu became the Home Rule League's ambassador to England where the Government of India Act (1919) was being passed, which did create an Legislative Assembly but with a small membership of 93 elected delegates (with 42 appointed and an upper house of 34 elected and 26 appointed members). It did not grant women the vote. In July 1920 she returned to India and on August 1 Mahatma Gandhi declared the Non-Cooperation Movement. In January 1924, she was one of the two Indian National Congress delegates at the East African Indian Congress. She travelled in East and South Africa as an advocate of the needs of the scattered Indian communities.

स्त्रीयांचे जीवन संकुचीत झाले आहे. आजही आधुनिक वैज्ञानिक काळात सुध्द स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला नाही. स्त्री–पुरुष समानतेमुळे समाजात स्वैराचार, अनैतिकता उपभोगवाद, पाश्चात्यांचे अंधानुकरण इ. दोष निर्माण होईल त्यामुळे समाजव्यवस्था रसातळाला जाईल. वास्तविक समतेच्या व स्वातंत्र्याच्या विचारांचा अयोग्यप्रकारे नकारात्मक अर्थ घेण्याऐवजी विधायक अर्थ घेतला तर स्त्री पुरुषांचे जीवन अधिक सुंदर व प्रगल्भ बनेल भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल तर पुरुषांच्या मानसिकतेत परिवर्तनाची गरज आहे. मानवीय दृष्टीकोन मानवतावादी विचारसरणी बदलविण्याची गरज आहे. स्त्रियांची प्रतिभा जितकी फुलेल त्याच्या अंतःशक्ती तितक्या साकार होईल. स्त्रीयांची कर्तृत्वसमता व सर्जनशिलता मानन टाकणे म्हणजे एकुणच मानवजातीचे नुकसान आहे ते मानवजातीच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. समाजव्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे जिथे मानवी जीवनात परस्पर विश्वासाचे वातावरण राहील व आनंदाने जीवन वहन होईल.

संदर्भ :–

१. नरहर कुरुंदकर – मनुस्मृती – गांधी विचार
२. कौटिल्य अर्थशास्त्र
३. धनंजय कीर – महात्मा फुले
४. आ.इ.सावूंके – हिंदु संस्कृती आणि स्त्री
५. क्रांतीकारी नारी आंदोलन की दिशा – नारी मुक्ती वीमेन्स इन इंडियन सोसायटी
६. शरद पाटील – दासशुद्रांची गुलामगीरी खंड –१ भाग पहिला.

❖❖❖

१९४२ च्या 'चले जाव' चळवळीत अमरावती जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान

डॉ. गोविंद मा. तिरमनवार
सहयोगी प्राध्यापक (इतिहास)
स्व. देवराव पुमदेव कला महा.
नांदगाव पेठ, ता. जि.अमरावती.

१९४२ ची 'चले जाव चळवळ' किंवा 'भारत छोडो' हा लढा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील अतिशय व्यापक स्वरूपाचा शेवटचा लढा होता. १८५७ पासून ते १९४२ पर्यंत लढल्या गेलेल्या स्वातंत्र्याच्या सर्व लढ्यात या लढ्याचे स्वरूप जास्त सशक्त, तीव्र व राष्ट्रव्यापी होते. "भारत छोडो" हे घोषवाक्य असलेल्या या लढ्यात गांधीजींनी दिलेली "कृती करा किंवा मरण पत्करा" या मंत्राने प्रेरित झालेले हजारो सर्वसामान्य स्त्री–पुरुष व लहान मुले या लढ्यात उतरले.

मुंबईसह देशाच्या अनेक भागात चळवळीने जोर धरला असताना विदर्भाही या चळवळीने चांगला वेग घेतला. १९४२ ची चळवळ विदर्भात मोठ्या प्रमाणावर झाली. विदर्भातील लोक सक्रियपणे चळवळीत सहभागी झालीत.

मुंबईचे काँग्रेस अधिवेशन आटोपून त्यावेळी नागपूर विदर्भातील नेते विदर्भात परत येत होते त्यावेळी त्यांना आपल्या हद्दीत आल्यानंतर म्हणजे मलकापूरला काही आल्यानंतर पकडण्यात आले. मोठ्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना ठिकठिकाणच्या रेल्वे स्टेशनवर पकडण्यात आले.[1] अशा स्थितीत विदर्भातील जनतेला कोणाचेही नेतृत्व नाहिले तसतसा जनतेने स्वबळावर हिंसा अथवा अहिंसा याचा विशेष विचार न करता ही चळवळ चालविली.

विदर्भात या कालावधीत अनेक रोमांचकारी घटना घडल्या. सरकारी कार्यालयावर, पोस्ट ऑफीसवर, विद्युत केंद्रावर, सरकारी धान्याच्या गोदामावर हल्ले झाले. शासकीय महाविद्यालयाला आग लावण्याचा प्रयत्न झाला. घातपाती कृत्याने संयोजन हिंदुस्थान रेडआर्मीचे नेते करीत होते.[2] चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा येथील लोकांनी दिलेला साहसी लढा हा स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला गेला. १९४२ च्या या लढ्यात विदर्भातील अनेक भागातील महिलांनी महत्त्वाचे योगदान दिले. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी लढा दिला.

भारतातील महिलांनी सर्वच स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. महात्मा गांधींनी मुक्ती लढ्याची इच्छा जोपलेली आहे आणि राष्ट्रीय काँग्रेसनेही एक प्रस्ताव पारीत केला की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिलांनी जे योगदान दिले ते भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहले जाईल. भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्य संग्रामाचे लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे भारतीय महिलांचा त्यातील उत्साहपूर्ण व उत्साहपूर्ण सहभाग होय. शेकडो वर्ष घराच्या चौकटीत अडकून पडलेल्या भारतीय महिलांनी घरचाच चौकट ओलांडली आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला. सुशिक्षित–अशिक्षित, श्रीमंत–गरिबी भिन्न धर्माच्या, भिन्न जातीच्या, भिन्न संस्कृतीचा प्रभाव असलेल्या लक्षावधी भारतीय महिला संतीचे बाण घेवून स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्या. साऱ्या जगाच्या इतिहासात अपवादानेच आढळणारे हे वास्तव आहे. म्हणूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांच्या महत्त्वाला वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.[3] भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भारताच्या निरनिराळ्या भागातील महिलांप्रमाणेच वैदर्भीय महिलांचाही मोठा वाटा आहे.

८ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव' या ठराव काँग्रेसने मंजूर केल्यानंतर अमरावती शहरात आणि जिल्ह्यात जोरात आंदोलन सुरू झाले. यावली, बेनोडा या ठिकाणी तीव्र स्वरूपाचे आंदोलन झाले. १९४२ च्या चले जाव चळवळीत अमरावती जिल्ह्यातील स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आरती मंडळामुळे या जिल्ह्यातील महिलावर्गात राजकीय जाण निर्माण झाली होती. या जिल्ह्यातील जागृत महिला १९४२ च्या लढ्याचे वेळी आष्टीच्या संग्रामात कमी संख्येने का होईना पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या होत्या. बरूडला २५ मे १९४२ ला ६०० लोकांची सभा पुरुषाचे शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. और वामनराव जोशींची एकसष्ठी संपन्न करण्याच्या

निमित्ताने या सभेचे आयोजन करण्यात आले होते. वीर वामनराव जोशी काँग्रेसच्या उत्कर्षाकरीता खूप परिश्रम घेतले अशी त्यांची स्तुती करणारी भाषणे शंकरराव देव आणि पार्वतीबाई पटवर्धन यांनी दिली.[4]

पुलगावमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी व त्यांचा आत्मविश्वास वृध्दीगत करण्यासाठी त्यांनी शिबीरे घेतली जात. १५ जून १९४२ ला हिंदसेवा दलाने मुलींच्या सोळा शिबीरांचे आयोजन केले होते. ५५ विद्यार्थीनींच्या शिबीराला उपस्थित होत्या. हे शिबीर रोहणखेड (वामणगांव) या खेडयात घेण्यात आले. शिबीरात कर्वेच्या गौराबाई विठ्ठलराव कोरडे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. अनेक खेळ मुलींना शिकविले. विठ्ठल लक्ष्मण आणि सुखदेव विष्णु खराडे यांनी टळकी आणि रूमाल या वस्तू मुलींना बक्षीस दिल्या. जपानच्या आक्रमणामुळे भयभीत झालेल्या इंग्रजाविरूध्द आपल्या देशाची सेवा करावी असे मुलींना सुचविण्यात आले. १९४२ मध्ये डॉ. बी.जे. दिवाणजींच्या पत्नी दिवाणजी बाईंनी अमरावतीत कामगारांचा मोर्चा काढला. कामगारांना निश्चित पगार मिळावा, त्याचप्रमाणे महागाई भत्ता मिळावा या उद्देशाने मोर्चा काढलेला होता. या मोर्चात ५० महिला होत्या.[5]

काँग्रेस मुबंईला अधिवेशन घेवून चलेजाव या ठराव पास करणार या घटनेचा धसका ब्रिटीश सरकारने घेतला होता आणि म्हणून सरकारने ठराव पारित होण्यापूर्वीच अमरावती शहरात अटकसत्र सुरू केले होते. ५ ऑगस्ट रोजी श्री. शंकरराव दुबे यांना अटक करण्यात आली. अमरावती शहरातील ही पहिली अटक समजली गेली. त्यानंतर बऱ्याच जणांना तुरूंगात डाबण्यात आले. दिनांक १ ऑगस्ट रोजी संभाजीराव गोखले, वीर वामनराव जोशी, डॉ. भोजराज यांना व १० ऑगस्टलाच डॉ. अण्णासाहेब देशमुख, डॉ. सोमण, बाळासाहेब मराठे आणि बाळकृष्ण भंडारी यांना अटक करण्यात आली.[6]

या अटक सत्राची तीव्र प्रतिक्रिया उमटली. यावेळी ब्रिटीशांनी अनेकांना अटक केली. सरकारने वृत्तपत्रावर आणि रेडीओवर अनेक बंधने घातली. त्यामुळे लोकांच्या संतापात भर पडली. नेत्यांच्या अटकेने तरूण मने संतप्त होत होती. प्रक्षोभाच्या वातावरणाखाली अमरावतीतले युवक आणि पोलीस यांच्यात झटापटी घडत होत्या. त्यातच तुकडोजी महाराजांच्या झंझावती प्रचार सुरू होता त्यामुळे जनतेत एक प्रकारे चैतन्य निर्माण झाले होते. दुपारनी बॉम्बची जागा घेतली. शाळा, कॉलेजस सर्वच बंद होती. सारा विद्यार्थी वर्ग पेटून रस्त्यावर आला होता. प्रक्षोभित जमाव नगरपालिकेसमोर एकत्रित आला व त्यांनी मिरवणूक काढण्याचा प्रयत्न केला. अमरावतीतले सर्व रस्ते अडविण्यात आले. लोकांनी सिटी कोतवालीवर राष्ट्रीय झेंडा फडकविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जमाव हटविण्याच्या घोषणा करून पोलीस लोकांवर चालून येवू लागले. त्यामुळे राष्ट्रीय घोषणा देत लोक दगडफेक करू लागले.[7]

कृष्णाबाई रगारी यांचे बलिदान :–

सिटी कोतवालीवर झेंडा लावण्याकरीता अमरावती शहरात जमाव जमला होता. जमावाने राष्ट्रीय घोषणा देत दगडफेक सुरू केली तेव्हा पोलीस अधिकारी मेल्डूम घाबरला आणि त्याने पोलीसांना लाठीमार करण्याचा आदेश दिला. परंतु लाठीमाराने लोक हटत नाही हे लक्षात आल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी गोळीबार करण्याचा हुकूम दिला. तेव्हा पोलीसांनी प्रथम हवेत गोळीबार केला. त्यावेळी जमावाने चहूबाजूनी दगडांचा वर्षाव सुरू केला. पोलीसांनी आता जमावाच्या दिशेने थेट्या झाडण्यास प्रारंभ केला तेव्हा मोर्शी तालुक्यातील गणेशपुरची कृष्णाबाई रगारी ही तरूण महिला राजकमल चौकाच्या दिशेने जात होती. जाता जाता ती मिरवणूक पाहत होती, तिला या मिरवणूकीचा अभिमान वाटत होता. इतक्यात पोलीसांची एक गोळी कृष्णाबाई रगारी यांच्या छातीत घुसली. कृष्णाबाई स्वताच्या घरोळ्यात पडली आणि शहीद झाली.

कृष्णाबाई शहीद झाली ही बातमी कळली तर लोक आणखी चिडतील आणि ते आपल्यावर त्वेषाने हल्ला चढवतील या भीतीने पोलीसांनी लगेच कृष्णाला वाही काढू न देता कृष्णाबाईला चादरीत टाकले आणि कृष्णाबाईवर त्यांनी अंत्यसंस्कार केले. त्यामुळे समाजातील लोकांना कृष्णाबाई शहीद झाल्याची ही बातमी कळली नाही.[8]

कृष्णाबाईची ही हकीगत लोकांपासून लपविली तरी सरकारी दप्तरात तिची नोंद झालीच आणि संपूर्ण विदर्भातील एकमेव शहीद महिला म्हणून कृष्णाबाईचे नाव अजरामर झाले.[9]

भूमिगत कार्यकर्त्यांना महिलांची मदत :–

ऑगस्ट क्रांती आंदोलनाचे क्रांतिकारक रामनारायण काश्मिरी आणि हिंदुस्थानी लालसेनेचे सरसेनापती मगनलाल बागडी भूमिगत असताना अमरावतीला आले. काश्मिरी आठ दिवस तर मगनलाल बागडी अनेक

दिवस अमरावतीला होते. काश्मिरी जेठमलजी बजोर यांच्याकडे तर मगनलाल बागडी बद्रीप्रसादजी ठाकूर व मित्रांच्याकडे होते. यावेळी या भूमिगत नेत्यांना सुरक्षित राखण्यात अमरावतीच्या महिलाही सहभागी होत्या.

मुंदराबाई पटेरिया यांचा पराक्रम :–

चले जाव चळवळ सर्वत्र जोरात सुरू असताना आणि अमरावती शहरातील सर्व प्रमुख नेत्यांना तुरूंगात टाकले असताना अमरावतीच्या छबपुरी खिडकी भागात राहणाऱ्या साधारण परिस्थितीच्या विजोदिया ब्राम्हण परिवारातील श्रीमती मुंदराबाई मनसुखलाल पटेरिया या शूर महिलेने, फारशिक पध्दतीच्या पडदा पध्दतीची पर्वा न करता किंवा समाज काय म्हणेल याची सुध्दा पर्वा न करता सार्वजनिक कार्यालयावर नेत्यांकरीता महिलांचा मोर्चा काढला. श्रीमती कांताबेन वर्मा या पराक्रमी महिलेने या मोर्चाचे नेतृत्व केले होते.

अमरावती शहरातील काढलेल्या या मोर्चाचे ठिकठिकाणी स्वागत झाले. शहरपूर निघालेला हा महिलांचा मोर्चा प्रथम जेल भागातील वकीलांच्या बार रूममध्ये गेला. मोर्चातील वकीलांना कायद्याचा अहेर केला. तेथून त्या डेप्युटी कमिश्नरच्या कार्यालयावर गेल्या. महिलांच्या मोर्चाची बातमी पोलिसांना कळताच पोलीसांनी महिलांना अडविले आणि त्यानंतर सर्व महिलांना कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये आणले. पोलीसांनी महिलांना माफी मागावी यासाठी त्यांच्यावर दडपण आणले. परंतु महिलांनी माफी मागण्यास नकार दिला. यावेळी मुंदराबाई पटेरिया यांनी सरकारने आपल्यावर खटला भरावा असे आव्हान दिले. शेवटी सरकारने मुंदराबाईवर खटला भरला आणि मुंदराबाईला त्या खटल्यात एक महिन्याची शिक्षा झाली.[10]

कोणत्याही शोधीची पर्वा न करता देशासेवेने भारलून गेलेल्या मुंदराबाई पटेरिया यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केलेला पराक्रम हा निश्चितच प्रेरणादायी आहे.

अमरावतीच्या इतर महिलांचा पराक्रम :–

१९४२ च्या या चळवळीत अमरावतीमधील अनेक कुटुंब सक्रीय सहभागी होते. त्यात हरिपंत देवधर यांचा समावेश होता. ते स्वत: सरकारी नोकरीत होते पण त्यांच्या कुटुंबातील सदस्य त्यांची पत्नी लक्ष्मीबाई, भाऊ, आणि मुली यांनी चळवळीत भाग घेतला. लक्ष्मीबाई या कमलाबाई शिवाजीराव पटवर्धन यांच्यासोबत चळवळीत सहभागी असत. लक्ष्मीबाई देवधरांच्या मुली शांता व इंदू या लहान मुलांच्या भगिनी प्रभात फेऱ्यामध्ये राष्ट्रीय गाणी व सभांमध्ये स्वागत गीत म्हणावयास जात असत.[11]

पुणेचे प्राध्यापक ठाकूर हे व्यवसायनिमित्त अमरावतीला स्थाईक झाले. ते काँग्रेसचे कार्यकर्ते होते. १९४२ च्या आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांना तुरूंगवासाची भोगवा लागला. त्यांच्या पत्नी कमलाबाई या वनिता समाज या प्रसिध्द संस्थेच्या संस्थापक सदस्या होत्या. कमलाताई काँग्रेसच्या महिला आघाडीत कार्य करीत होत्या. १९४२ च्या आंदोलनात प्रभावी वक्तृत्वामुळे त्या प्रसिध्दीस आल्या.

शेंदूरजना घाट येथील शांता यादव पिंजरकर या महिलेने या चळवळीत भाग घेवून महत्वपूर्ण कामगिरी केली. प्रभावती बाळकृष्ण बेलसरे या मोर्शीच्या महिलेने एक वर्षापर्यंत भूमिगत राहून महत्वाचे कार्य केले. शांताबाई बीयर घट या कम्युनिस्ट विचारसरणीच्या महिलेने संघटनकार्याबरोबरच राजकीय चळवळीत भाग घेतला. त्यांनी १९४२ च्या चळवळीत सहभागी असलेल्या लोकांना आश्रय दिला. कार्यकर्त्यांना आर्थिक मदत केली. भूमीगत असलेल्या कार्यकर्त्यांना त्यांनी भरपूर मदत केली.[12]

अमरावती व यावतीमाळ जिल्हयातील सर्वच तालुक्यामधून १९४२ च्या चलेजाव चळवळीने वेग घेतला. बेलोरा, इत्तमगांव, लोणी या भागात जनतेने सरकारवर हात न उचलता इंग्रज मुल्कच्या राज्याचा पराक्रम केला. संपूर्ण अमरावती जिल्हयात या चळवळीने व्यापक स्वरूप घेतले. अनेक लहान लहान गावातल्यालोकांच्या या आंदोलनात पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून महिला सहभागी झाल्या होत्या. अनेक महिलांनी पुरूषांना लढण्यासाठी विरोध केले होते. अनेक महिलांनी अप्रत्यक्षरित्या आंदोलनकर्त्यांना मदत केली. महिलांनी दिलेल्या योगदानाची पाहिजे त्या प्रमाणात इतिहासात नोंद न झाल्यामुळे आजही अनेक सक्रीय सहभाग घेणाऱ्या महिलांची कामगिरी काळाच्या उदरात गडप झालेली दिसते.

संदर्भ

१. श. गो. कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मनोज प्रकाशन, नागपूर २००३,पृ. १९८.
२. सुमन वैद्य, शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. ९१.
३. आर.सी. मुजुमदार (संपा), 'स्ट्रगल फॉर फ्रिडम', पृ. ४७२–४७३.
४. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मनोज प्रकाशन, नागपूर २००३, पृ. २०५.
५. फिल्ला पृ. २०६.
६. नानासाहेब विवेकर, अमरावती जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, आं.क्रा.सु.म. समिती १९९२, पृ.५७.
७. श. गो. कोलारकर, उपरोक्त, पृ. २३०.
८. तात्या धर्माधिकारी, स्वातंत्र्य लढ्यातील स्त्री, पृ. ९२.
९. दमयंती पाठक, उपरोक्त, पृ. २०७.
१०. बा.ब. खापर्डे (संपा), 'अमरावती शहराचा इतिहास', अमरावती महानगरपालिका अमरावती २०००, पृ. २९२.
११. संदीप हातेकार (संपा), 'भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात विस्मरणीय महिलांची भूमिका', (स्मरणिका) २०११, पृ. ४३.
१२. फिल्ला पृ. ४४.
१३. बा.ब. खापर्डे (संपा), उपरोक्त, पृ. ३०३.

❖❖❖

मराठी साहित्याचे सामाजिक योगदान

डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे
नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत

मराठी साहित्याचा विचार करता १९६० पूर्वी मराठी साहित्याचा मानबिंदू मनोरंजन हा होता. पुढच्या काळात मात्र मराठी साहित्याचे प्रयोजन बदलले. साहित्याचे प्रयोजन व परिणाम कालकेंद्रीत न राहता, समाजाभिमुख बनले. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे माध्यम मानले गेले. ते चळवळीचे माध्यम बनले. या भूमिकेतून पुढच्या काळात साहित्याच्या विविध चळवळी, अनेक प्रवाह महाराष्ट्रामध्ये उदयाला आले.

साहित्याच्या व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी एकमेकांना सोबत–संगत करीत, ज्या काळात महाराष्ट्रामध्ये संकोच होत्या, त्या काळात साहित्याच्या चळवळींनी व चळवळींशी नाते सांगणाऱ्या लेखकांनी, वाचिलकी मानणाऱ्या लेखकांनी परिवर्तनाला पूरक असे साहित्य लेखन केले. या लेखकांनी कलेचे, कला प्रयोजनाचे, साहित्य निर्मितीचे संदर्भ बदलले नाहीत, तर समाजामध्ये सामाजिक परिवर्तनाच्या साहित्याचे तात्त्वान रुजविले. सोबतच फुले–शाहू–आंबेडकरांचे परिवर्तनाचे शास्त्र ही समाज मनात रुजविण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली व पूर्ण क्षमतेने आपले ध्येय साध्य करण्याचे कार्य केले.

खऱ्या अर्थाने म. फुलेंच्या साहित्याचे समाजात मोठे योगदान आहे. म. फुले यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य :–

एक थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजसुधारणा केली. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्या केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुरवस्था आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली. या प्रबंधाद्वारे विशाल दृष्टीकोनाचा क्रांतीकारक म्हणूनही ज्योतिरावांचे दर्शन होते. 'नीती हेच मानवी जीवनाचा आधार आहे.' हा विचार मांडणारे ज्योतिराव एक तत्त्वचिंतक व्यक्तीमत्त्व होते. म. फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी अनेक ग्रंथ लिहिले. तृतीयरत्न, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, अस्पृश्यांची कैफीयत, शेतकऱ्यांचा आसूड इ. ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मुलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वबंधुत्व कसे निर्माण होईल व त्याकरिता कशाप्रकारे वर्णनकम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे म. फुलेंनी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' सहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे.

म. फुलेंच्या 'तृतीयरत्न' या नाटकाचा सारा इतिहास नाट्यपूर्ण आहे. ज्योतिरावांनी २८ व्या वर्षी इ.स. १८५५ साली हे नाटक लिहिले. नाटक लिहिण्याचा हेतू ज्योतिबा लिहितात, 'भट जोशी आपल्या मतलबी धर्माच्या नावा देऊन अज्ञानी शुद्रास कसे कसे फसवून खातात व खिस्ती उपदेशक आपल्या निःपक्षपाती धर्माच्या आधारानें अज्ञानी शुद्रास खरे ज्ञान सांगून कसेकसे मार्गावर आणतात, या सर्व गोष्टी म. फुलेंनी या नाटकाच्या माध्यमातून सांगितले.

सावित्रीबाई फुले :–

म. फुलेंना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी अनन्यभावाने आयुष्यभर सहकार्य दिले. स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या महाराष्ट्रातील पहिली अग्रणी म्हणून महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहास त्यांची दखल जरूर घेईल. ज्योतिरावांची सगळी विचारसरणी त्यांनी आत्मसात केली होती. ज्योतिरावांच्या निधनानंतरही सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाची धुरा त्यांनी वाहिली. त्यांनी काव्यरचनेच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. काव्यफुले, बावनकशी सुबोधरत्नाकर या काव्य संग्रहाच्या माध्यमातून समाज परिवर्तनात मोठे योगदान सावित्रीबाई फुले यांचे आहे.

या दोन समाज सुधारकानंतर साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक साहित्यिकांनी सामाजिक भान लक्षात ठेवून लिखान केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन साठोत्तरी वाङ्मयखंडात दलित साहित्यातून तीव्र सामाजिक भान व्यक्त होत होते.